(7)

2021-22-(4)
PRJ

330

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal (Journal No. 47100)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL



# GENIUS

Volume - X, Issue - II,
February - July - 2022
English / Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.538
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - X, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2022
**GENIUS - ISSN 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.538** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | नवभारताचे शिल्पकार : पंडित जवाहरलाला नेहरू<br>**प्रा. डॉ. पी. आर.जुनघरे** | १-५ |
| २ | नवीन शैक्षणिक धोरणावर जागतिकीकरणाचा प्रभाव<br>**डॉ. अतुल नारायण खोटे** | ६-१० |
| ३ | "बुर्गाट" एकविसाव्या शतकातील स्त्री समस्या प्रधान कादंबरीचे स्वरूप<br>**प्रा. सिद्धार्थ कुंडलिक इंगोले** | ११-१४ |
| ४ | भारतीय संविधान व लोकशाहीची वाटचाल<br>**प्रा. सौ. सुषमा सु. जाजु** | १५-१८ |
| ५ | भारतीय संविधानातील लोकशाही मूल्ये आणि पंडित जवाहरलाल नेहरू<br>**डॉ. सुभाष एस. गवई**<br>**कु. प्रिया प्रकाशराव इंझळकर** | १९-२४ |
| ६ | संत गाडगे महाराजांचे कीर्तनातून समाज प्रबोधन<br>**प्रा. डॉ. सविता माधवराव पवार** | २५-२८ |
| ७ | स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक कार्य आणि समाज सुधारकांचे योगदान<br>**डॉ. लक्ष्मीकांत ना. देशपांडे** | २९-३४ |

VOLUME - X, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2022
GENIUS - ISSN 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.538 (www.sjifactor.com) CC - 8

# १. नवभारताचे शिल्पकार : पंडित जवाहरलाला नेहरू

प्रा. डॉ. पी. आर. जुनघरे
इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर जि. बुलडाणा.

## प्रस्तावना

१५ ऑगष्ट १९४७ हा भारताच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहला गेलेला अनन्यसाधारण दिवस होय. या दिवसी दोन शतकाच्या पारतंत्र्याचा अंधःकार नाहीसा झाला व स्वातंत्र्य सूर्याच्या किरणांनी देश उजळून निघाला अर्थात स्वातंत्र्य प्राप्तीचा हा आनंद निर्भेळ नव्हता. त्या आनंदावर देशाच्या विभाजनाचे रक्ताळलेले सावट पसरले होते देशासमोर अनेक समस्या होत्या. अराजक, हिंसाचार, जाळपोळ, कत्तली, लक्षावधीचे स्थलांतर, आर्थिक विपन्नावस्था, स्वार्थी मनोवृत्तीने पोखरलेला समाज, संस्थानाचे विलीनीकरणाचा प्रश्न अशा अनेक समस्या नवस्वातंत्र्य झालेल्या भारत देशासमोर उभ्या होत्या. अशा परिस्थितीत समता, बंधुता, सामाजिक न्याय, व्यक्तिस्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता या पायावर राष्ट्रैक्य साधून, बळकट अशा नवभारताची निर्मिती करणे हे मोठे आव्हान तत्कालीन भारतीय नेतृत्वासमोर होते. स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हे आव्हान स्विकारले. भारताबद्दलचे असीम प्रेम, आंतराष्ट्रीय राजकारणाचे अचूक आकलन, देशाच्या प्रगतीकरीता अहोरात्र झिजण्याची सिद्धता, बुद्धीवादी व्यापक दृष्टीकोन व आधुनिक विज्ञान या आधारावर नवभारताची उभारणी करण्याकरीता त्यांनी आयुष्यभर आयुष्यभर प्रयत्न केले. नानाविध अडथळे पार करून प्रसंगी जळजळीत टीका सहन करून नवराष्ट्राच्या उभारणी करीता पंडित जवाहरलाल नेहरू अहर्निश झटले. नवभारताचे शिल्पकार म्हणून भारताच्या इतिहासात नेहरुचे स्थान अत्यंत मानाचे आहे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

### 1. संसदीय लोकशाहीची निर्मिती

भारतापुढील बहुविध समस्या व गरजा यांचा स्वातंत्र्यपूर्ण काळातच नेहरूंनी सखोल विचार केला होता. लोकशाही, धर्मनिरपेक्ष राज्य, या कल्पना लोकमानसात रुजवण्याचा प्रयत्न केला होता. नवभारताची निर्मिती लोकशाहीच्या आधारावरच झाली पाहिजे कारण भाषण, मत, वृत्तपत्र स्वातंत्र्य व कायद्याचे शासन शासन या द्वारेच मानवी प्रतिष्ठेची बूज राखली जावू शकते. लोकशाही, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक न्याय या गोष्टी व्यक्तिविकासाला व राष्ट्राच्या स्थैर्याला, दृढतेला आवश्यक आहेत अशी त्यांची निश्चित धारणा होती. तसेच ब्रिटीश अधिसत्ते विरुद्ध कॉंग्रेसने दिलेल्या लढ्याचे स्वयंशासन हे एक उद्दिष्ट्य उद्दिष्ट्य तर होतेच त्याचबरोबर जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीच्या हाती राजकीय सत्ता असावी ही कल्पना त्यांना अभिप्रेत होती. त्यापुढे लोकशाही, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक न्याय हे

स्वातंत्र्यपूर्व काळातील आदर्श, गांधींचा प्रभाव व भारताची सामाजिक जडनघडण ह्या गोष्टी विचारात घेवून घेवून नेहरूंनी लोकशाही राज्यव्यवस्था स्विकारली. त्यादृष्टीने संविधान निर्मिती करून संसदीय लोकशाहीची लोकशाहीची निर्मिती केली. तसेच ती जनमाणसात रुजवून दृढ करण्याचे आटोकाट प्रयत्न केले. संसदेतील नियमाचे ते काटेकोरपणे पालन करीत असत त्यामुळे त्यांना लोकशाहीचे 'संगोपक' असे म्हटले तर चूक ठरणार नाही.

2. धर्मनिरपेक्ष राष्ट्राची निर्मिती

लोकशाही राज्यव्यवस्थे बरोबर भारत हे एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र असले पाहिजे, या बद्दल नेहरूंच्या मनात तिळमात्रही संदेह नव्हता. अनेक धर्मांचे, वंशांचे, पंथांचे लोक भारतात राहत असल्याने असल्याने शासन धर्मनिरपेक्ष असले तरच राष्ट्रैक्य साधले जावू शकेल , हे उघडच होते त्यामुळे आपल्या धर्मानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला असावे. मात्र धर्म ही प्रत्येक व्यक्तीची खाजगी बाब असावी. राजकारणात धर्माला स्थान असू नये, सर्व धर्माप्रती शासनांची भूमिका सहिष्णुतेची व निती समानतेची असावी असे नेहरूंचे धोरण होते. त्यांचा राष्ट्राचे ऐक्यावर भर होता अंतःस्थ दुही किंवा झगडे राष्ट्राच्या प्रगतीला घातक ठरतील हे ते जाणून होते. १९३१ च्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात स्वतंत्र भारताचे शासन धर्मनिरपेक्ष राहील असा ठराव पारीत केला होता. प्रामुख्याने त्यामध्ये नेहरुंचाच पुढाकार होता. त्यापुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्या नीतीला वास्तव रूप देण्याकरीता १९५० मध्ये राज्यघटनेत तरतूद करण्यात आली व व धर्मनिरपेक्ष शासन पद्धतीचा पाया घातला. धर्मवेडेपणा, कर्मठपणा, संप्रदायवाद यांची पाळेमुळे भारतीय भूमीत खोलवर रुजलेली असताना सुद्धा नेहरूंनी खंबीरपणे भारताला धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनविले. थोडक्यात धर्मनिरपेक्ष राष्ट्राची निर्मिती ही नेहरूंची एक सर्वात महत्वाची यशसिद्धी होय अशा आशयाचे उद्गार अमेरिकेचे भारतातील राजदूत चेस्टर बौल्स यांनी काढले होते.

3. समाजवादी विचारसरणीचा स्विकार

इंग्लंडमधील विध्यार्थी दशेतच त्यांचेवर फेबियनच्या समाजवादी विचारांचा प्रभाव पडलेला होता. मार्क्स व लेनिन यांच्या अभ्यासाचा त्यांचे मनावर खोलवर परिणाम झाला होता. साम्राज्यवाद व वसाहतवाद याबद्दल त्यांना विलक्षण चीड होती. ब्रिटनविरुद्धचा भारताचा स्वातंत्र्यलढा हा एक साम्राज्यवाद व वसाहतवाद याविरुद्धचा लढा आहे असे त्यांचे मत होते. समाजवादी तत्वाचे प्रभावामुळे ब्रिटीशाच्या गुलामगिरीतून देश स्वतंत्र झाल्यानंतर त्यांनी स्वतंत्र भारताची जडणघडण शोषणरहित व विषमतारहीत असावी, सर्वांना आर्थिक व सामाजिक समानता प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी समाजवादी विचारधारेला मानवतावादी दृष्टीकोनातून स्विकारले. भारतातील दारिद्र्य व बेकारीच्या भस्मासुराचा अंत करावयाचा असेल असेल समाजवादाशिवाय अन्य पर्याय नाही असे त्यांचे मत होते. जनसामान्यांचे दारिद्र्य, मानसिक दौर्बल्य, परावलंबित्व, सरंजामशाहीचे निर्मुलन करून सामाजिक व सांस्कृतिक प्रगती करावयाची असेल तर समाजवादाशिवाय तरणोपाय नाही. मात्र त्यांना परंपरा, संस्कृती, गांधीवाद, उदारमतवाद यांचे मिश्रण

समाजवादात अपेक्षित होते. कारण नेहरू लोकशाहीचे निःस्सीम उपासक होते. त्यांना लोकशाही मार्गाने जाणारा समाजवाद अभिप्रेत होता.

4. नियोजन मंडळाची स्थापना

हंगामी सरकार स्थापन होवून शासनाची जबाबदारी नेहरूंकडे येताच त्यांनी प्रथम सल्लागार नियोजन मंडळाची व त्यानंतर १९५० मध्ये नियोजन मंडळाची स्थापना केली. नियोजन मंडळाच्या कार्याबाबत भारत सरकारने पारीत केलेल्या ठरावाचा मसुदा नेहरूंनीच तयार केला होता. घटनेतील मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे यांच्याशी नियोजनाच्या योजना निगडीत असाव्या अशी तरतूद त्यामध्ये करून सामाजिक व आर्थिक विषमतेचे निर्मुलन, सर्वांना पूर्णवेळ काम, साधनसामग्रीवर राष्ट्राची मालकी पैसा व अर्थशक्ती काही थोड्या व्यक्तींच्या हातात केंद्रीत होणार नाही अशा स्वरूपाची उद्दिष्ट्ये नियोजन आयोगाची आयोगाची होती. भारताच्या अर्थकारणाला नियोजनाचा आधार देवून आर्थिक विकासाच्या योजनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. सर्व महत्त्वाचे भारी व मुलभूत उद्योग, खनिजे व अन्य साधनसामग्री, रेल्वे, नौकानयन व दळवळणाची साधने यावर राष्ट्राची मालकी हक्क राहील अशा आशयाचा ठराव १९३१ च्या कराची कॉंग्रेसमध्ये त्यांच्याच पुढाकाराने पारित झाला होता. त्याला वास्तव रूप देण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या कार्यकाळात केला.

5. मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार व भारताची आर्थिक प्रगती

दुसऱ्या जागतिक महायुद्धामुळे भारताची अर्थव्यवस्था होरपळून निघाली होती. त्यातच स्वातंत्र्याबरोबर देशाची फाळणी ही झाली होती. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा समतोल ढासळला होता. तो दुरुस्त करणे लोकांचे राहणीमान उंचावून आर्थिक विषमता कमी करणे लोकांना समान संधी व रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक होते. म्हणून प्रधानमंत्री नेहरू यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. भांडवलवादी व समाजवादी अर्थव्यवस्थेतील चांगल्या तत्वाचा स्विकार केला, दोष टाळून गुणांचा अंगिकार केला. नेहरूंच्या कार्यकाळात भिलाई, भाक्रानांगल यासारखी मोठमोठी उद्योग व जलसिंचन केंद्रे निर्माण झाली.

पंचवार्षिक योजनांचे आधारे शेतीउत्पादन वाढले. औद्योगिक उत्पादनात लक्षणिय वाढ झाली, रेल्वेमार्गाची निर्मिती करण्यात आली. दरडोई उत्पन्न वाढले. पोलाद क्षेत्रातील भिलाई, दुर्गापूर, रुरकेला हे कारखाने नेहरूंचे कार्यकाळात सुरु झाले. त्यामुळे बेकार हातांना काम मिळून रोजगारांच्या संधी निर्माण झाल्यात. शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य याबाबत देश परावलंबी राहू नये म्हणून शस्त्रास्त्र निर्मितीला सुरवात त्यांच्याच काळात झाली.

6. असंलग्नतेची परराष्ट्रनिति

स्वतंत्र भारताचे प्रधानमंत्री म्हणून नेहरूंची एक अत्यंत महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी घालून दिलेली राष्ट्राची परराष्ट्रनिति. स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी भारताची परिस्थिती व गरजा लक्षात घेवून त्यांनी अलिप्ततावादाचे धोरण स्विकारले. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी सन १९४६ साली स्थापन झालेल्या हंगामी

सरकारचे प्रमुख असतांनी ७ सप्टेंबर १९४६ रोजी आकाशवाणीवर भाषण करतांना ते म्हणाले होते, "सत्तेच्या राजकारणातील गटापासून शक्य तितके अलिप्त राहण्याचा आमचा विचार आहे. या गटबाजीमुळे जगावर युद्ध कोसळली व भविष्यातही याहून मोठी संकटे येण्याची शक्यता आहे. शांतता व स्वातंत्र्य मानवी विकासाचे अविभाज्य अंग आहे. स्वातंत्र्याची गळचेपी म्हणजे संघर्ष व युद्धाला निमंत्रण होय" असे उद्गार त्यांनी काढले होते.

महायुद्धानंतर जगाची विभागणी दोन गटात झाली होती, त्यातून शितयुद्ध सुरु झाले होते. दोन्ही गटातील राष्ट्रांनी नाटो, सिटो, सेंटो व वार्सा यासारखे लष्करी करार करून स्वतःला संरक्षणाच्या साखळीने बांधले होते. अनेक देशांनी आपली स्वतःची विचारसरणी व सारासार विवेकबुद्धी यांना तिलांजली देवून बंधने स्विकारली होती. नेहरूंना अशी बंधने नको होती म्हणून त्यांनी आपले स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधीत ठेवण्यासाठी असंलग्नतेच्या नीतीचा अवलंब केला. नेहरूंवर सातत्याने टिका करणारे विद्यमान सरकार सुद्धा परराष्ट्र धोरणांत नेहरूंच्याच मार्गाने जात असल्याचे सध्याच्या युक्रेन – रशिया संघर्षातील भारताचे भूमिकेवरून लक्षात येते.

7. भारताची वैज्ञानिक प्रगती

भारतात विज्ञान व संशोधन या क्षेत्रात झपाट्याने प्रगती व्हावी याकरीता नेहरूंनी केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. त्याचा दृष्टीकोन जातिवंत वैज्ञानिकांचा होता विज्ञान, तंत्रज्ञान, बुद्धिवादी विचारसरणी, लोकशिक्षण या बाबी औद्योगीकरणाला भरीवपणे उपकारक ठरणाऱ्या होत्या म्हणून त्यांनी वैज्ञानिक प्रगतीवर लक्ष केंद्रित केले. वैज्ञानिक संशोधनाचे महत्त्व ओळखून, संशोधन कार्याकरिता सरकारकडून सढळ हाताने पैसा दिला जावू लागला. विज्ञान तंत्रज्ञानाचे विकासाकरिता १९५१ मध्ये तंत्रज्ञान संस्थेची स्थापना केली . मुंबई येथे नेहरूंचे पाठींब्यामुळेच होमी भाभा यांचे मार्गदर्शनाखाली अॅटोमिक रिअॅक्टर केंद्रांची स्थापना झाली. एकूण वैज्ञानिक प्रगतीसाठी नेहरूंनी सर्वोतपरी प्रोत्साहन व सहाय्य दिले.

8. अढळ राष्ट्रनिष्ठा

पंडित जवाहरलाल नेहरू कट्टर राष्ट्रवादी होते आपल्या देशाच्या आत्मगौरवाबद्दल संवेदनाक्षम होते परराष्ट्रांनी भारताला कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करावा हे त्यांना सहन होत नसे. भारतीय संस्कृती कला व तत्वज्ञान याबद्दल त्यांना सार्थ अभिमान होता. नेहरूंची सत्यनिष्ठ व राष्ट्रप्रेम वादातीत होते. राष्ट्रहितासाठी राष्ट्रहितासाठी व्यक्तिगत क्रोध किंवा आकस त्यांने गिळला. कॉंग्रेस गांधी व नेहरू यांच्यांवर जिनांनीही वाहिली नसेल अशी अपशब्दांची लाखोली डॉ. आंबेडकरांनी वाहिली. १९४२ मध्ये कॅनडा येथील परिषदेला पाठविलेल्या पत्रात नेहरूंचा आंबेडकरांनी उपहास केला परंतु त्याबद्दल वाटणारी खंत बाजूला ठेवून राष्ट्रकार्याकरिता त्यांचे गुणांचा उपयोग व्हावा या हेतूने त्यांना आपल्या मंत्रिमंडळात सामावून घेतले, वैयक्तिक हेवेदावे द्वेष, किंवा स्वार्थ बाजूला ठेवून नेहरू राष्ट्रहितासाठी अहर्निश झटले.

सारांश

नेहरूंचे व्यक्तिमत्व कार्य याबद्दल अनेक उलटसुलट मते त्यांच्या जीवनकाळात व आजही मांडली जातात. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत देशासमोर अनेक समस्या असतांना पंडीत जवाहरलाल नेहरूंनी संसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्था, संमिश्र अर्थव्यवस्था व असंलग्नतेची निती स्विकारून नवभारताची निर्मिती करण्यासाठी नेहरूंनी अहोरात्र परिश्रम घेतले. नेहरूंची राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रप्रेम वादातीत होते राष्ट्रहितासाठी त्यांनी व्यक्तिगत क्रोध किंवा आकस बाजूला ठेवून डॉ. आंबेडकरांसारख्या आपल्या कट्टर विरोधकाला सोबत घेऊन देशहितास्तव त्यांच्यातील गुणांचा उपयोग करून घेतला. संस्थानांच्या विलीनिकरणाच्या कार्यात सरदार पटेलांना पूर्ण सहकार्य केले. अंतरराष्ट्रीय राजकारणाचे अचूक आकलन, दूरदृष्टी व समाजवादाकडील त्यांचा कल ह्या गोष्टी नवभारताची राजकीय व आर्थिक घडी बसविण्याच्या दृष्टीने मोलाच्या ठरल्या. "चर्चिल, स्टॅलिन व रुझवेल्ट युगानंतर जगाच्या रंगमंचावरील सर्वात प्रभावी व्यक्तिमत्व म्हणजे नेहरू होय, दंडुक्याच्या सहाय्याने नव्हे तर प्रेमाच्या आधारे शासन चालविणारा एकमेव एकमेव नेता" अशा आशयाचे नेहरूंच्या कार्याचे मूल्यमापन १९५६ मध्ये न्यूयॉर्क टाईम्स ने केले यावरून नेहरूंच्या कार्याची यथार्थता लक्षात येते. त्याचबरोबर सध्या सुरु असलेल्या रशिया – युक्रेन संघर्षामध्ये भारताची भूमिका नेहरूंच्याच मार्गाने जात असल्याचे दिसते.

संदर्भ ग्रंथ सुची

१. आधुनिक भारताचा इतिहास, (१९४७-२०००), कोठेकर डॉ. शांता, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २०१४.
२. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, पवार डॉ. जयसिंगराव, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी २०१४.
३. आधुनिक भारत, आचार्य डॉ. धनंजय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, एप्रिल २०११.
४. पंडित जवाहरलाल नेहरू, खिलाफत ते काश्मीर, अरुण सारथी, अस्मिता प्रकाशन, पुणे २००६.
५. संपादकीय अग्रलेख, लोकसत्ता, २८ फेब्रुवारी २०२२.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana